**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक**
**(विकास आस्थापना शाखा)**
**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101**
**दूरध्वनी क्र. 0253-2468650 E-mail-crunsk-divcom@mah.gov.in**

---

क्र. विआशा/पंरा-1/जिपनि/9336787/2026 दि.स्वाक्षरी खाली नमूद आहे.

प्रति,

1.जिल्हाधिकारी,
नाशिक, धुळे, जळगाव,अहिल्यानगर,नंदुरबार.

2. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर, नंदुरबार.

विषय- महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या ( नामनिर्देशित सदस्यांची पात्रता व नियुक्ती) नियम, 2026.

संदर्भ- अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.जिपनि-2026 /प्र.क्र.10/ई-1726904/पं.रा.-2 दि.09.07.2026

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने सूचित करण्यात येते की, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई यांचेकडील संदर्भीय पत्राची प्रत आपणास देखील देण्यात आलेली आहे.

सदर पत्रान्वये दिनांक 03 जुलै, 2026 रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-चार-ब मध्ये सन 2026 ची अधिसूचना असाधारण क्रमांक 388 व असाधारण क्रमांक 389 मध्ये हरकती व सूचना करिता पूर्व प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेची प्रत (मराठी व इंग्रजी) उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

सदर अधिसूचना आपल्या कार्यालयातील तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयातील सुचना फलकांवर लावण्यात यावी.

सोबत- अधिसूचना (मराठी व इंग्रजी) प्रत.

Digitally signed by
Ujwala Vijay Kolse
Date: 14-07-2026
14:18:18

**(उज्वला बावके-कोळसे)**
**अपर आयुक्त (आस्थापना)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक**

प्रत- 1.सचिव राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई-32

2.अवर सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, 25 मर्झबान पथ, मुंबई-1

3. अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई -४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-२२०१७१०६ ई मेल: sopr२.rdd-mh@nic.in

क्र. जिपनि-२०२६/प्र.क्र.१०/ई-१७२६९०४/पं.रा.२ दिनांक : ०९ जुलै,२०२६

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,महाराष्ट्र राज्य

विषय :- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (नामनिर्देशित सदस्यांची पात्रता व नियुक्ती ) नियम,२०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या दि.०३ जुलै,२०२६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण भाग-चार-ब मध्ये सन २०२६ ची अधिसूचना असाधारण क्रमांक ३८८ व असाधारण क्रमांक ३८९ मध्ये हरकती व सूचना करिता पूर्व प्रसिध्द करण्यात आली आहे.सदर अधिसूचनेची प्रत (मराठी व इंग्रजी) सोबत जोडली असून तिचे कृपया अवलोकन व्हावे.

सदर अधिसूचना आपल्या कार्यालयातील तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयातील सुचना फलकांवर लावण्यात यावी,ही विनंती.

आपला,

(बा.म.आसोले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- अधिसूचना ( मराठी व इंग्रजी) प्रत.

प्रत:- संग्रहार्थ पं.रा. २



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
. Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM

9336787(1)/2026/DCNSK-DEV. EST.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १०३] शुक्रवार, जुलै ३, २०२६/आषाढ १२, शके १९४८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ३ जुलै, २०२६.

**अधिसूचना**

**जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक जिपनि. २०२६/प्र.क्र.१०/ई-१७२६९०४/पं.रा.२.— महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (महा. १९६२ चा ५) च्या कलम २७४ च्या पोट-कलम (२) मधील खंड (xiv) अन्वये तसेच याबाबत सक्षम करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनास "महाराष्ट्र पंचायत समित्या (नामनिर्देशित सदस्यांची पात्रता व नियुक्ती) नियम, २०२६" या मसुदा नियमांचा पुढील मजकूर, उक्त अधिनियमाच्या कलम २७४ च्या पोट-कलम (३) नुसार, याद्वारे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी यान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तसेच, या अधिसूचनेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत प्राप्त होणाऱ्या सदर मसूदा नियमांवरील हरकती किंवा सूचना यांचाच महाराष्ट्र शासनाकडून विचार करण्यात येईल, अशी यान्वये सूचना देण्यात येत आहे.

२. सदर मसुदा नियमांबाबत त्यामुळे बाधित होण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांच्याकडे वरील नमूद दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी प्राप्त होणाऱ्या हरकती किंवा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**नियमांचा मसूदा**

१. **संक्षिप्त नाव.—** हे नियम " महाराष्ट्र पंचायत समित्या (नामनिर्देशित सदस्यांची पात्रता व नियुक्ती) नियम, २०२६" म्हणून ओळखले जातील.

२. **व्याख्या.—** (१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(अ) "अधिनियम" याचा अर्थ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (महा. १९६२ चा ५) असा आहे;



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM

(ब) "जिल्हाधिकारी" याचा अर्थ संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी असा आहे.

(२) या नियमांमध्ये वापरलेले परंतु परिभाषित न केलेले शब्द व पदप्रयोग यांना अधिनियमामध्ये त्यांना नेमून दिलेले अर्थ अनुक्रमे लागू होतील.

३. **नामनिर्देशित सदस्यांची संख्या निश्चित करणे.—** नियम ४ मधील तरतुदींच्या अधीन राहून, जिल्हाधिकारी पंचायत समितीमध्ये नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या पंचायत समितीच्या एकूण निर्वाचित सदस्य संख्येच्या वीस टक्के किंवा किमान एक व्यक्ती, यांपैकी जी संख्या जास्त असेल त्याप्रमाणे निश्चित करून नामनिर्देशन करतील.

४. **नामनिर्देशनासाठी पात्रता.—** एखादी व्यक्ती नामनिर्देशित सदस्य पदासाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित होण्यास पात्र असेल, जर तिला जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या प्रशासनासंबंधी विशेष ज्ञान किंवा कार्यानुभव असेल आणि ती,—

(अ) संबंधित पंचायत समिती क्षेत्राची रहिवासी असेल; आणि

(ब) राज्यातील मान्यताप्राप्त व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिक (Medical Practitioner) म्हणून किमान पाच वर्षे कार्यरत असेल; किंवा

(क) मान्यताप्राप्त शाळा किंवा महाविद्यालयांमधील सेवानिवृत्त प्राध्यापक, व्याख्याते किंवा प्राचार्य यांच्यासह शिक्षणतज्ज्ञ म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली; किंवा

(ड) कृषी, जलसंधारण, सहकार, ग्रामीण विकास, महिला व बाल विकास, कला, साहित्य, समाजकार्य या क्षेत्रांमध्ये विशेष ज्ञान असलेली आणि वरीलपैकी कोणत्याही क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली; किंवा

(ई) मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी धारण केलेली आणि अभियांत्रिकी क्षेत्रात किमान पाच वर्षांचा व्यावसायिक अनुभव असलेली; किंवा

(फ) किमान पाच वर्षे वकील (Advocate) म्हणून कार्यरत किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी पदवी (Law Degree) धारण केलेली आणि राज्यातील विधी क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली; किंवा

(ग) केंद्र शासन किंवा राज्य शासनाच्या सेवेत किमान वीस वर्षांची सेवा पूर्ण केलेला सेवानिवृत्त अधिकारी असलेली; किंवा

(घ) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणीकृत अशासकीय संस्थेचा (Non-Government Organization) पदाधिकारी म्हणून, जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात सामाजिक कल्याणविषयक उपक्रमांमध्ये कार्यरत राहून किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली व्यक्ती असेल.

५. **सदस्यांचे नामनिर्देशनः-**

(१) जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेमधील मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांच्या नेत्यांशी सल्लामसलत करून आणि अशा पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ (Relative Strength) विचारात घेऊन, सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यासाठी योग्य व्यक्तींची नावे पंचायत समितीकडे शिफारस करतील. अशा प्रकारे शिफारस करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या नियम ३ नुसार नामनिर्देशित करावयाच्या सदस्यसंख्येपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ५९अ च्या पोट-कलम (४) मधील तरतुदींनुसार स्थापन झालेल्या मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करताना प्रथम पंचायत समितीच्या एकूण सदस्यसंख्येला नामनिर्देशित सदस्यांच्या संख्येने भाग दिला जाईल. त्यानंतर या भागाकाराच्या संख्येने संबंधित मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांच्या पंचायत समितीतील सदस्यसंख्येला भाग दिला जाईल. अशा प्रकारे प्राप्त झालेली संख्या हा त्या पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ मानण्यात येईल. जागांचे वाटप प्रथम संबंधित तौलनिक संख्याबळातील पूर्णांक विचारात घेऊन करण्यात येईल आणि त्यानंतर एक किंवा अधिक जागा वाटपासाठी शिल्लक राहिल्यास, त्या जागांचे वाटप संबंधित मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांच्या तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठ्या अपूर्णांकापासून सुरुवात करून अपूर्णांकांच्या उतरत्या क्रमाने वाटून दिल्या जातील.

परंतु आणखी असे की, शिल्लक जागांचे वाटप तौलनिक संख्याबळातील अपूर्णांकांच्या उतरत्या क्रमाने करताना, जर अपूर्णांक अध्यपेक्षा कमी असेल तर तो विचारात घेतला जाणार नाही आणि त्यासाठी कोणतीही जागा वाटप केली जाणार नाही. अशा प्रकारे जागांचे वाटप केल्यानंतरही एक किंवा अधिक जागा वाटपाविना राहिल्यास, त्या जागा व्यपगत (Lapsed) झाल्याचे मानल्या जाईलः

परंतु असेही की, वरील तरतुदीनुसार अपूर्णांकांच्या उतरत्या क्रमाने नामनिर्देशित जागांचे वाटप करताना दोन किंवा अधिक मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांचे अपूर्णांक समान असल्यास, अशा पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सोडत (Lots) काढून संबंधित व्यक्तीचे जिल्हाधिकारी नामनिर्देशन करतील.

(२) पंचायत समिती, जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या शिफारशींचा विचार करून सदस्यांचे नामनिर्देशन करील :—

परंतु असे की, पंचायत समितीने जिल्हाधिकाऱ्यांनी शिफारस केलेल्या एखाद्या व्यक्तीबाबतची शिफारस स्वीकारू नये असा निर्णय घेतल्यास, त्याची कारणे लेखी स्वरूपात नोंदविण्यात येतीलः

परंतु आणखी असे की, नियम ४ मधील खंड (अ) ते (घ) मधील अर्हता असणाऱ्या प्रत्येकी एका व्यक्तीचे पंचायत समिती सदस्य म्हणून नामनिर्देश सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

६. **पंचायत समितीच्या नामनिर्देशित सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे.—** जिल्हाधिकारी, शक्य तितक्या लवकर, अशाप्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध करण्यासाठी पाठवतील.

७. **प्रासंगिक रिक्त पदे .—** नामनिर्देशित सदस्याची जागा रिक्त झाल्यास, ती जागा भरण्यासाठी या नियमांतील तरतुदी यथास्थित (*Mutatis Mutandis*) लागू होतील.

८. **नामनिर्देशित सदस्यांना प्रमाणपत्र.—** नामनिर्देशित सदस्यांची नावे **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रकाशित झाल्यानंतर, जिल्हाधिकारी नामनिर्देशित सदस्यास संलग्न नमुन्यात (Form) प्रमाणपत्र देतील.

**नमुना**

(नियम ८ पहा)

**प्रमाणपत्र**

मी, ........ श्री/श्रीमती ______________________, जिल्हाधिकारी, ______________ जिल्हा, याद्वारे प्रमाणित करतो/करते की श्री/श्रीमती ______________________ यांची पंचायत समितीमध्ये अधिसूचना क्रमांक __________ अन्वये नामनिर्देशनाद्वारे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, आणि त्यांची/त्यांची सदस्य म्हणून नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा विद्यमान पंचायत समितीच्या कार्यकाळाच्या समाप्तीपर्यंत, यापैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत करण्यात आली आहे.

स्थळ :
दिनांक :

जिल्हाधिकारी,

जिल्हा ______________

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वर्षा मुं. भरोसे,**
शासनाच्या सह सचिव.



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001, dated 3rd July, 2026.

*NOTIFICATION*

ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No.ZPN-2026/C.R.10/E-1726904/P.R.2.— The following draft of the Maharashtra Panchayat Samitis (Qualification and Appointment of Nominated Members) Rules, 2026, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (xiv) of sub-section (*2*) of section 274 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) and of all other powers enabling it in this behalf, is hereby published as required by sub-section (*3*) of section 274 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that objections or suggestions on the said draft sent within 30 days form the date of the notification will only be taken into consideration by the Government of Maharashtra.

2. Any objection or suggestion, may be sent to the Secretary, Rural Development Department, Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai-400 001 with respect to the said draft Rules from any person likely to be affected thereby; on or before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

**1.** *Short title.*— These rules may be called the Maharashtra Panchayat Samitis (Qualifications and Appointment of Nominated Members) Rules, 2026.

**2.** *Definitions.*— (1) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) "Act" means the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samities Act, 1961 (Mah. V of 1962);

(*b*) "Collector" means the collector of the concerned District,

(2) Words and expressions used but not defined in these rules shall have the meanings respectively assigned to them in the Act.

**3.** *Determination of Number of Nominated Member.*— Subject to the provisions of rule 4, the Collector shall nominate Members to the Panchayat Samiti equal to twenty per cent of the total number of elected Members of Panchayat Samiti, or a minimum one person, whichever is higher.

**4.** *Eligibility for Nomination.*— A person shall be eligible for being nominated as a candidate for the office of the nominated member if he has special knowledge or work experience in respect of the administration of Zilla Parishad or Panchayat Samiti, and he,—

(*a*) is a resident of the concerned Panchayat Samiti area; and

(*b*) has been a recognized and registered medical practitioner in the State for a minimum period of five years; or

(*c*) has been an educationist including retired professors, lecturers or principals of recognized schools or colleges for a minimum period of five years; or

(*d*) is possessing specialized knowledge in the fields of Agriculture, Water Conservation, Co-operation, Rural Development, Women and Child Development, Art, Literature, Social Work and has experience in any of the above fields for a period of five years; or

(*e*) possesses a degree in an engineering from a recognized university and has professional experience for a minimum period of five years; or

(*f*) has been an advocate for a minimum period of five years or is a person possessing degree in Law from a recognized University with a experience in the legal field in the State for a minimum period of five years, or



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM

(*g*) is a retired officer who has completed at least twenty years of Central or State Government service; or

(*h*) has experience of not less than five years as an office-bearer of a Non-Government Organization registered under the Maharashtra Public Trusts Act, engaged in Social Welfare activities, working within the area of the Zilla Parishad or Panchayat Samiti.

**5.** *Nomination of Member.—*

(1) The Collector shall, after consultation with the leaders of recognized or registered parties, groups or aghadis or front in the Zilla Parishad, and taking into account the relative strength of such parties or groups, recommended the names of suitable persons to the Panchayat Samiti for being nominated as Members. The names of such persons recommended shall not exceed the number of Members to be nominated in accordance with rule 3:

Provided that, the relative strengths of recognized parties or registered parties or group or aghadi or front formed as per the provisions of the sub-section (*4*) of section 59A of the Act shall be calculated by first dividing the total number of Members of Panchayat Samiti by the strength of number of nominated Member. The number of Member of Panchayat Samiti of the recognized parties or registered parties, group or aghadi or front shall be further divided by the quotient of this division. The figure so arrived at shall be the relative strength of the respective recognized parties or registered parties or group or aghadi or front. The seat shall be allotted to the recognized parties or registered parties or groups or aghadis or front by first considering the whole number of their respective relative strength so ascertained and thereafter if one or more seats remained to be allotted, the same shall be allotted to such recognized parties or registered parties or groups, aghadis or fronts in the descending order beginning with the largest fractioning value of the proportionate strength of the respective recognized parties or registered parties, groups, aghadis or fronts:

Provided further that, while allocating the remaining seats by considering the fractional values in proportionate strength in descending order, if the fraction is less than half, it shall not be taken into account and no seat shall be allocated for it. After allocating seats in this manner, if one or more seats remain unallocated, they shall be treated as lapsed:

Provided also that, while nominating the person as nominated Member on the basis of the descending order of the fraction number as mentioned in above proviso, if two or more recognized parties, registered parties or groups, aghadis or fronts have the same fraction number, then the Collector shall, nominate the person belonging to such recognized parties, registered parties or groups, aghadis or fronts selected on the basis of lots drawn in the presence of representatives of all such parties, groups, aghadis, or fronts.

(2) The Panchayat Samiti after considering the recommendations made by the Collector, nominate the Members :

Provided that, if the Panchayat Samiti decides not to accept the recommendation of the Collector with respect to a person so recommended, it shall record the reasons therefor:

Provided further that, every endeavor shall be made to ensure that one Member each possessing any of the qualifications referred to in clauses (a) to (h) of rule 4 has been nominated.

**6.** *Publications of names of nominated Members of the Panchayat Samiti.*— The Collector shall as soon may be, send the names of the persons so nominated, for publication in the *Maharashtra Government Gazette*.

**7.** *Casual vacancies.*— When a seat of a nominated member becomes vacant, the provisions of these rules shall *Mutatis Mutandis* apply, for filling the vacancy.

**8.** *Certificate to nominated Members.*— After publication of the names of the nominated members in the *Maharashtra Government Gazette*, the Collector shall issue a Certificate in Form appended herewith to each of the nominated member.



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM

9336787(1)/2026/DCNSK-DEV. EST.



FORM

(*See* Rule 8)

CERTIFICATE

I, .......................... Shri/Smt. ............................................. Collector ..........................District hereby certify that Shri/Smt. ........................................... Notification No. .............. on the has been nominated *vide* Panchayat Samiti, and has appointed as a member for a term of five years or till the expiry of the term of the present body of the Panchayat Samiti, whichever is earlier.

Place :

Date :

Collector of the District.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VARSHA M. BHAROSE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM

9336787(1)/2026/DCNSK-DEV. EST.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १०३(२)] शुक्रवार, जुलै ३, २०२६/आषाढ १२, शके १९४८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ३ जुलै, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक जिपनि-२०२६/प्र.क्र.१०/ई-१७२६९०४/पं.रा.२.— महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (महा. १९६२ चा ५) च्या कलम २७४ च्या पोट-कलम (२) मधील खंड (i-a) अन्वये तसेच याबाबत सक्षम करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनास "महाराष्ट्र जिल्हा परिषदा (नामनिर्देशित सदस्यांची पात्रता व नियुक्ती) नियम, २०२६" या मसुदा नियमांचा पुढील मजकूर, उक्त अधिनियमाच्या कलम २७४ च्या पोट-कलम (३) नुसार, त्याद्वारे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याअन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तसेच, या अधिसूचनेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत प्राप्त होणाऱ्या सदर मसुदा नियमावरील हरकती अथवा सूचना यांचाच महाराष्ट्र शासनाकडून विचार करण्यात येईल, अशी याअन्वये सूचना देण्यात येत आहे.

२. सदर मसुदा नियमांबाबत त्यामुळे बाधित होण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांच्याकडे वरील नमूद दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी प्राप्त होणाऱ्या हरकती किंवा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**नियमांचा मसुदा**

१. **संक्षिप्त नाव :—** हे नियम "महाराष्ट्र जिल्हा परिषदा (नामनिर्देशित सदस्यांची पात्रता व नियुक्ती) नियम, २०२६" म्हणून ओळखले जातील.

२. **व्याख्या :—** (१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "अधिनियम" याचा अर्थ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (महा. १९६२ चा ५) असा आहे;

(ब) "जिल्हाधिकारी" याचा अर्थ संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी असा आहे.



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM

(२) या नियमांमध्ये वापरलेले परंतु परिभाषित न केलेले शब्द व पदप्रयोग यांना अधिनियमामध्ये त्यांना नेमून दिलेले अर्थ असेल.

३. **नामनिर्देशित सदस्यांची संख्या निश्चित करणे :—** नियम ४ मधील तरतुदींच्या अधीन राहून, जिल्हाधिकारी जिल्हा परिषदेमध्ये नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या जिल्हा परिषदेच्या एकूण निर्वाचित सदस्यसंख्येच्या दहा टक्के किंवा किमान पाच व्यक्ती, यांपैकी जी संख्या जास्त असेल त्याप्रमाणे निश्चित करून नामनिर्देशन करतील.

४. **नामनिर्देशनासाठी पात्रता :—** एखादी व्यक्ती नामनिर्देशित सदस्य पदासाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित होण्यास पात्र असेल, जर तिला जिल्हा परिषदेच्या प्रशासनासंबंधी विशेष ज्ञान किंवा कार्यानुभव असेल आणि ती,—

(अ) संबंधित जिल्हा परिषद क्षेत्राची रहिवासी असेल; आणि

(ब) राज्यातील मान्यताप्राप्त व नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिक (Medical Practitioner) म्हणून किमान पाच वर्षे कार्यरत असेल; किंवा

(क) मान्यताप्राप्त शाळा किंवा महाविद्यालयांमधील सेवानिवृत्त प्राध्यापक, व्याख्याते किंवा प्राचार्य यांच्यासह शिक्षणतज्ञ म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली; किंवा

(ड) कृषी, जलसंधारण, सहकार, ग्रामविकास, महिला व बाल विकास, कला, साहित्य, समाजकार्य या क्षेत्रांमध्ये विशेष ज्ञान असलेली आणि यापैकी कोणत्याही क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली; किंवा

(ई) मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी धारण केलेली आणि अभियांत्रिकी क्षेत्रात किमान पाच वर्षांचा व्यावसायिक अनुभव असलेली; किंवा

(फ) किमान पाच वर्षे वकील (Advocate) म्हणून कार्यरत असलेली असेल किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी पदवी (Law Degree) धारण केलेली आणि राज्यातील विधी क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली; किंवा

(ग) केंद्र शासन किंवा राज्य शासनाच्या सेवेत किमान वीस वर्षांची सेवा पूर्ण केलेला सेवानिवृत्त अधिकारी असलेली; किंवा

(घ) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणीकृत अशासकीय संस्थेचा (Non-Government Organization) पदाधिकारी म्हणून, जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात सामाजिक कल्याणविषयक उपक्रमांमध्ये कार्यरत राहून किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली व्यक्ती असेल.

५. **सदस्यांचे नामनिर्देशन :—**

(१) जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेतील मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांच्या नेत्यांशी सल्लामसलत करून आणि अशा पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ (Relative Strength) विचारात घेऊन, सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यासाठी योग्य व्यक्तींची नावे जिल्हा परिषदेकडे शिफारस करतील. अशा प्रकारे शिफारस करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या नियम ३ नुसार नामनिर्देशित करावयाच्या सदस्य संख्येपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम १०-१अ च्या पोट-कलम (४) मधील तरतुदींनुसार स्थापन झालेल्या मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांची तौलनिक संख्याबळ निश्चित करताना प्रथम जिल्हा परिषदेच्या एकूण सदस्य संख्येला नामनिर्देशित सदस्यांच्या संख्येने भाग दिला जाईल. त्यानंतर या भागाकाराच्या संख्येने संबंधित मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांच्या जिल्हा परिषदेतील सदस्य संख्येला त्या भागाकाराने भाग दिला जाईल. अशा प्रकारे प्राप्त झालेली संख्या हा त्या पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांची तौलनिक संख्याबळ मानण्यात येईल. जागांचे वाटप प्रथम संबंधित तौलनिक संख्याबळातील पूर्णांक विचारात घेऊन करण्यात येईल आणि त्यानंतर एक किंवा अधिक जागा वाटपासाठी शिल्लक राहिल्यास, त्या जागांचे वाटप संबंधित मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांच्या तौलनिक संख्याबळातील मोठ्या अपूर्णांकापासून सुरु करून अपूर्णांकांच्या उतरत्या क्रमाने वाटून दिल्या जातीलः

परंतु आणखी असे की, शिल्लक जागांचे वाटप तौलनिक संख्याबळातील अपूर्णांकांच्या उतरत्या क्रमाने करताना, जर अपूर्णांक अर्ध्यापेक्षा कमी असेल तर तो विचारात घेतला जाणार नाही आणि त्यासाठी कोणतीही जागा वाटप केली जाणार नाही. अशा प्रकारे जागांचे वाटप केल्यानंतरही एक किंवा अधिक जागा वाटपाविना शिल्लक राहिल्यास, त्या जागा व्यपगत (Lapsed) झाल्याचे मानले जाईल :



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM

परंतु असेही की, वरील तरतुदीनुसार अपूर्णांकांच्या उतरत्या क्रमाने नामनिर्देशित जागांचे वाटप करताना दोन किंवा अधिक मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांचे अपूर्णांक समान असल्यास, अशा पक्ष, गट, आघाडी किंवा फ्रंट यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सोडत ( Lots ) काढून संबंधित व्यक्तीचे जिल्हाधिकारी नामनिर्देशन करतील.

( २ ) जिल्हा परिषद, जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या शिफारशींचा विचार करून सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु असे की, जिल्हा परिषदेने जिल्हाधिकाऱ्यांनी शिफारस केलेल्या एखाद्या व्यक्तीबाबतची शिफारस स्वीकारू नये असा निर्णय घेतल्यास, त्याची कारणे लेखी स्वरूपात नोंदविण्यात येतील :

परंतु आणखी असे की, नियम ४ मधील खंड ( अ ) ते ( घ ) मधील अर्हता असणाऱ्या प्रत्येकी एका व्यक्तीचे जिल्हा परिषद सदस्य म्हणून नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

६. **जिल्हा परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे :—** जिल्हाधिकारी, शक्य तितक्या लवकर, अशा प्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध करण्यासाठी पाठवतील.

७. **प्रासंगिक रिक्त पदे :—** नामनिर्देशित सदस्याची जागा रिक्त झाल्यास, ती जागा भरण्यासाठी या नियमांतील तरतुदी यथास्थित ( *Mutatis Mutandis* ) लागू होतील.

८. **नामनिर्देशित सदस्यांना प्रमाणपत्र :—** नामनिर्देशित सदस्यांची नावे **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रकाशित झाल्यानंतर, जिल्हाधिकारी प्रत्येक नामनिर्देशित सदस्यास संलग्न नमुन्यात ( Form ) प्रमाणपत्र निर्गमित करतील.

**नमुना**

**(नियम ८ पहा)**

**प्रमाणपत्र**

मी, श्री./श्रीमती ............................, जिल्हाधिकारी, ............................ जिल्हा, याद्वारे प्रमाणित करतो/करते की श्री./श्रीमती ............................ यांची अधिसूचना क्रमांक .................. अन्वये .................. जिल्हा परिषदेमध्ये नामनिर्देशनाद्वारे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे आणि त्यांची/त्यांची सदस्य म्हणून नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा विद्यमान जिल्हा परिषदेच्या कार्यकाळाच्या समाप्तीपर्यंत, यांपैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत करण्यात आली आहे.

स्थळ :

दिनांक :

जिल्हाधिकारी, ____________ जिल्हा

महाराष्ट्र शासनाच्या राज्यपालांच्या आदेशानुसार व नावाने,

**वर्षा मुं. भरोसे,**
शासनाच्या सह सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001, dated 3rd July, 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No.ZPN-2026/C.R.10/E1726904/P.R.2.— The following draft of the Maharashtra *Zilla Parishads* (Qualification and Appointment of Nominated Members) Rules, 2026, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (i-a) of sub-section (*2*) of section 274 of the Maharashtra *Zilla Parishads* and *Panchayat Samitis* Act, 1961 (Mah. V of 1962) and of all other powers enabling it in this behalf, is hereby published as required by sub-section (*3*) of section 274 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that objections and suggestions on that said draft to be sent within 30 days from the date of this notification will only be taken into consideration by the Government of Maharashtra.

*2.* Any objection or suggestion, which may be sent to the Secretary, Rural Development Department, Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001 with respect to the said draft Rules from any person likely to be affected thereby; on or before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

*1. Short title :—* These rules may be called the Maharashtra Zilla Parishads (Qualifications and Appointment of Nominated Members) Rules, 2026.

*2. Definitions :—* (1) In these rules, unless the context otherwise requires,-

*(a)* "*Act*" means the Maharashtra *Zilla Parishads* and *Panchayat Samitis* Act, 1961 (Mah. V of 1962);

*(b)* "*Collector*" means the collector of the concerned District,

(2) Words and expressions used but not defined in these rules shall have the meanings respectively assigned to them in the Act.

*3. Determination of Number of Nominated Councillors.—* Subject to the provisions of rule 4, the Collector shall nominate Member to the *Zilla Parishad* equal to ten per cent of the total number of elected Councillors of *Zilla Parishad*, or a minimum five person, whichever is higher.

*4. Eligibility for Nomination.—* A person shall be eligible for being nominated as a candidate for the office of the nominated Councillor if he has special knowledge or work experience in respect of the administration of *Zilla Parishad* and he,—

*(a)* is a resident of the concerned *Zilla Parishad* area; and

*(b)* has been a recognized and registered medical practitioner in the State for a minimum period of five years; or

*(c)* has been an educationist including retired professors, lecturers or principals of recognized schools or colleges for a minimum period of five years; or

*(d)* is possessing specialized knowledge in the fields of Agriculture, Water Conservation, Co-operation, Rural Development, Women and Child Development, Art, Literature, Social Work and has experience in any of the above fields for a period of five years; or

*(e)* possesses a degree in an engineering from a recognized university and has professional experience for a minimum period of five years; or

*(f)* has been an advocate for a minimum period of five years or is a person possessing degree in Law from a recognized University with a experience in the legal field in the State for a minimum period of five years, or

*(g)* is a retired officer who has completed at least twenty years of Central or State Government service; or



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM

*(h)* has experience of not less than five years as an office-bearer of a Non-Government Organization registered under the Maharashtra Public Trusts Act, engaged in Social Welfare activities, working within the area of the Zilla Parishad or Panchayat Samiti.

**5. Nomination of Member.—** *(1)* The Collector shall, after consultation with the leaders of recognized or registred parties, groups or *aghadis* or front in the *Zilla Parishad,* and taking into account the relative strength of such parties or groups, recommend the names of suitable persons to the *Zilla Parishad* for being nominated as Councillors. The names of such persons recommended shall not exceed the number of Councillors to be nominated in accordance with rule 3:

Provided that, the relative strengths of recognized parties or registered parties or group or *aghadi* or front formed as per the provisions of the sub-section *(4)* of section 10-1A of the Act, shall be calculated by first dividing the total number of Councillors of *Zilla Parishad* by the strength of number of nominated Councillor. The number of Councillor of *Zilla Parishad* of the recognized parties or registered parties, group or *aghadi* or front shall be further divided by the quotient of this division. The figure so arrived at shall be the relative strength of the respective recognized parties or registered parties or group or *aghadi* or front. The seat shall be allotted to the recognized parties or registered parties or groups or *aghadis* or front by first considering the whole number of their respective relative strength so ascertained and thereafter if one or more seats remained to be allotted, the same shall be allotted to such recognized parties or registered parties or groups, aghadis or fronts in the descending order beginning with the largest fractioning value of the proportionate strength of the respective recognized parties or registered parties, groups, *aghadis* or fronts:

Provided further that, while allocating the remaining seats by considering the fractional values in proportionate strength in descending order, if the fraction is less than half, it shall not be taken into account and no seat shall be allocated for it. After allocating seats in this manner, if one or more seats remain unallocated, they shall be treated as lapsed:

Provided also that, while nominating the person as nominated Councillor on the basis of the descending order of the fraction number as mentioned in above proviso, if two or more recognized parties, registered parties or groups, *aghadis* or fronts have the same fraction number, then the Collector shall, nominate the person belonging to such recognized parties, registered parties or groups, *aghadis* or fronts selected on the basis of lots drawn in the presence of representatives of all such parties, groups, *aghadis*, or fronts.

*(2)* The *Zilla Parishad* after considering the recommendations made by the Collector, nominate the *Councillors*:

Provided that, if the *Zilla Parishad* decides not to accept the recommendation of the Collector with respect to a person so recommended, it shall record the reasons therefor:

Provided further that, every endeavor shall be made to ensure that one Councillor each possessing any of the qualifications referred to in clauses *(a)* to *(h)* of rule 4 has been nominated.

**6.** *Publications of names of nominated Councillors of the Zilla Parishad.*— The Collector shall as soon may be, send the names of the persons so nominated, for publication in the *Maharashtra Government Gazette*.

**7.** *Casual vacancies.*— When a seat of a nominated Councillor becomes vacant, the provisions of these rules shall *Mutatis Mutandis* apply, for filling the vacancy.

**8.** *Certificate to nominated Councillors.*— After publication of the names of the nominated Councillors in the *Maharashtra Government Gazette*, the Collector shall issue a Certificate in Form appended herewith, to each of the nominated Councillor.

9336787(1)/2026/DCNSK-DEV. EST.



*FORM (see rule 8)*

*CERTIFICATE*

I, Shri/Smt .......... Collector ............ District hereby certify that Shri/Smt. ......... has been nominated *vide* Notification No.... on the ............ *Zilla Parishad*, and has appointed as a Councillor for a term of five years or till the expiry of the term of the present body of the *Zilla Parishad,* whichever is earlier.

Place:

Date: Collector of the District.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VARSHA M. BHAROSE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.



File No. DCNSK-21029(23)/2/2025-DEV.EST (Computer No. 2061471)
Generated from eOffice by VINEETA GANPAT SANAP, DCNSK-DEV. EST-ARO(VGS), ASSISTANT REVENUE OFFICER, DIVISIONAL COMMISSIONER OFFICE NASHIK on 15/07/2026 10:19 AM